# कोर्ट विद्यमान श्री. रमेश कोळपे, तहसिलदार वर्धा यांचे न्यायालय

रा.मा.क्र.: MNL-37/पवनी/15/2023-24,
मौजा : पवनी, ता., जि. वर्धा.

**संदर्भ** :- मंडळ अधिकारी, सेवाग्राम व तलाठी खरांगणा (गोडे), ता., जि. वर्धा यांचा अहवाल प्राप्त दि. 12/09/2023.

**वादी** :- मंडळ अधिकारी, सेवाग्राम, ता., जि. वर्धा.
विरुध्द
**प्रतिवादी** :- वनविभाग तर्फे
श्री. रुपेश खेडकर,
वनपरिक्षेत्र अधिकारी, वर्धा.

## आदेश

**(पारीत दिनांक :06/10/2023)**

प्रस्तुत प्रकरण मंडळ अधिकारी, सेवाग्राम व तलाठी खरांगणा (गोडे), ता., जि. वर्धा यांचा अहवाल प्राप्त दि. 12/09/2023 चे अनुषंगाने सुरु करण्यात आले.

**ज्याअर्थी**, प्राप्त अहवालानुसार दि. 11/09/2023 रोजीचे तपासणीमध्ये मौजा पवनी, ता., जि. वर्धा येथील महाराष्ट्र शासन वनविभाग चे नावाने असलेला स.नं 70 मधुन अंदाजे 300 ब्रास माती काढून नेल्याचे दिसून आले.

**ज्याअर्थी**, पोलीस पाटील पवनी यांचेकडून प्राप्त माहितीनुसार मौक्यावरील मातीचे उत्खनन वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत अक्षय बुरांडे यांचे पोकलॅन वापरुन करण्यात आले असून उत्खनन करण्यात आलेली माती मौजा वरुड, ता., जि. वर्धा येथील वनविभागाच्या ऑक्सीजन पार्क मध्ये नेण्यात आली. मौक्यावरील मातीचे उत्खनन हे वनविभागाच्या जागेतून वनविभाव्दारेच करण्यात आल्याचे अहवालामध्ये नमुद करण्यात आले आहे.

**ज्याअर्थी**, प्रकरणामध्ये मागविण्यात आलेल्या मंडळ अधिकारी वर्धा व तलाठी वर्धा, ता., जि. वर्धा यांचे संयुक्त अहवाल दि. 14/09/2023 नुसार नविन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, वर्धा येथे अंदाजे 160 ते 170 ब्रास मातीचे ढिग दिसून येत आहे. सदर माती ही अक्षय बुरांडे यांनी येथे वाहतुक करुन आणली असल्याचे चौकशीअंती कळाले व याबाबत गौण खनिज वाहतुकीची कोणतीही परवानगी या किंवा उपविभागीय अधिकारी, वर्धा तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडून घेण्यात आलेली नाही.

**ज्याअर्थी**, प्रकरणामध्ये मागविण्यात आलेल्या तलाठी भुगाव, ता., जि. वर्धा यांचे अहवाल दि. 21/09/2023 नुसार भुगाव येथील रोपवाटीकेची तपासणी केली असता, सद्यस्थितीत रोपवाटीकेमध्ये माती टाकण्यात आली नसल्याचे दिसून आले तसेच उपस्थित वनरक्षक यांचेकडील चौकशीमध्ये सुध्दा अलीकडे माती आणली गेली नसल्याची माहिती मिळाली.

**ज्याअर्थी**, प्रकरणी तलाठी आंजी (मोठी), ता., जि. वर्धा यांचे अहवाल दि. 21/09/2023 नुसार मौजा आंजी (मोठी), ता., जि. वर्धा येथे माता नरसाई मंदीराला लागून आंजी रोपवाटीका (ऑक्सीजन पार्कला) सन 2018-19

मध्ये काम करण्यात आले असून मौक्का व स्थानिक चौकशी केली असता तेथे बाहेरुन माती/मुरुम आणली नसल्याची माहिती मिळाली नाही.

ज्याअर्थी, प्रकरणी तलाठी गुंजखेडा/पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा यांचे अहवाल दि. 26/09/2023 नुसार मौजा गुंजखेडा/पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा येथील स.नं. 128 मधील रोपवाटीकेची तपासणी केली असता दि. 11/09/2023 नंतर रोपवाटीकेमध्ये कामे झाली नसल्याचे तसेच मातीचे ढिग दिसून आले नाही.

ज्याअर्थी, या कार्यालयाचे पत्र क्र. अका/प्र-1/कावि-1458/2023, दि. 13/09/2023 व्दारे श्री. रुपेश खेडकर, वनपरिक्षेत्र अधिकारी, वर्धा यांना मौजा वरुड, ता., जि. वर्धा येथील ऑक्सीजन पार्क चे वनविभागाव्दारे करण्यात आलेल्या या कामासंबंधीचे Estimate सह कोणत्या कामात किती गौण खनिजाचा वापर करण्यात आला आहे, याबाबतची माहिती मागविण्यात आली असता अदयापही माहिती या कार्यालयास आजपर्यंत प्राप्त झालेली नाही. सदर माती उत्खननाचे काम हे वनपरिक्षेत्र अधिकारी, वर्धा यांचे अधिनस्त कार्यक्षेत्रात विनापरवानगी केले असल्याने उत्खनन अवैध आल्याचे दिसून येते.

ज्याअर्थी, प्रकरणामध्ये उपलब्ध अभिलेखाची तपासणी व करण्यात आलेल्या चौकशीअंती मंडळ अधिकारी सेवाग्राम व तलाठी खरांगणा (गोडे), ता., जि. वर्धा यांचे अहवालानुसार मौजा पवनी, ता., जि. वर्धा येथील महाराष्ट्र शासन वनविभाग चे नावाने असलेला स.नं 70 मधुन अंदाजे 300 ब्रास मातीचे अवैधपणे उत्खनन व वाहतुक वनविभाग (वनपरिक्षेत्र अधिकारी वर्धा) यांचेव्दारे करण्यात आले असल्याचे दिसून येते.

त्याअर्थी, मी, रमेश कोळपे, तहसिलदार वर्धा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 48(7) नुसार 300 ब्रास माती चे बाजारमुल्य रु. 1500/- प्रति ब्रास प्रमाणे (मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे पत्र क्र. अका/गौख/कावि-191/22, दि. 29/12/2022 नुसार) पाचपट दंड रु. 22,50,000/- अधिक स्वामित्वधन रु. 240/- प्रति ब्रास (महसूल व वन विभाग अधिसूचना दि. 4 जून, 2021 नुसार) प्रमाणे 300 ब्रास करीता 72,000/- असे एकुण रु. 23,22,000/-(अक्षरी रुपये तेवीस लाख बावीस हजार फक्त) गैरअर्जदार वनपरिक्षेत्र अधिकारी वर्धा यांनी त्वरीत शासन खजिना दाखल करण्यास आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश माझे सही व शिक्यानिशी पारीत.

तहसिलदार
वर्धा

तह. वर्धा
तहसिलदार, वर्धा

प्रत :-

1] मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांना माहितीकरीता सविनय सादर.

2] मा. उपविभागीय अधिकारी, वर्धा यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीकरीता सविनय सादर.

3] गैरअर्जदार श्री. रुपेश खेडकर, वनपरिक्षेत्र अधिकारी वर्धा यांना माहिती व दंडाची रक्कम त्वरीत शासन खजिना दाखल करुन पावती या कार्यालयास सादर करावी.

4] कार्यालयीन प्रत.

तह. वर्धा.
तहसिलदार, वर्धा